आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4 थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 03/02/२०२६ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 50 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com



# पिंपरी-चिंचवड महापौरपदी रवी लांडगे यांची बिनविरोध निवड जाहीर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणात आज मोठी आणि निर्णायक घडामोड घडली असून महापौरपदी रवी लांडगे यांची निवड बिनविरोध जाहीर झाली आहे. महापौर निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने कोणताही उमेदवार दाखल न झाल्याने ही निवडणूक थेट बिनविरोध पार पडत आहे.**

भारतीय जनता पक्षाच्या वतीने रवी लांडगे यांनी महापौरपदासाठी अर्ज दाखल केला असून, विरोधकांचा अभाव असल्याने त्यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब झाले आहे. आता केवळ अधिकृत घोषणा बाकी असून, ही निवडणूक औपचारिकतेपुरती मर्यादित राहिली आहे.

रवी लांडगे हे पिंपरी-चिंचवडच्या राजकारणातील अनुभवी, ठाम आणि विश्वासार्ह नेतृत्व मानले जातात. 2017 च्या महानगरपालिका निवडणुकीत ते पहिल्यांदा बिनविरोध नगरसेवक म्हणून नवडून आले होते. त्यानंतर 2026 च्या महानगरपालिका निवडणुकीतही ते पुन्हा एकदा दुसऱ्यांदा बिनविरोध नगरसेवक म्हणून निवडून आले, ज्यातून त्यांच्या लोकप्रियतेचा आणि जनविश्वासाचा प्रत्यय आला

नगरसेवकपदाच्या सलग दोन बिनविरोध विजयांनंतर आता रवी लांडगे महापौरपदीही बिनविरोध निवडून येत असून, पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात त्यांनी आपले वर्चस्व अधिक मजबूत केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवार न मिळणे हे महापालिकेतील सत्तासमीकरणे स्पष्ट करणारे ठरत असून, या घडामोडीमुळे शहराच्या राजकारणात भाजपाचा दबदबा पुन्हा एकदा ठळकपणे समोर आला आहे.

रवी लांडगे यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात असून, शहराच्या प्रशासनात आता निर्णायक आणि स्थिर नेतृत्व पाहायला मिळणार आहे.





# उपमहापौरपदासाठी भाजपाकडून शर्मिला बाबर मैदानात

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड शहराच्या उपमहापौर पदासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने नगरसेविका शर्मिला बाबर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यामुळे महापौर व उपमहापौर निवडणुकीतील चित्र अधिक स्पष्ट झाले असून, उपमहापौर पदासाठी राजकीय चुरस निर्माण झाली आहे.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने महापौरपदी रवी लांडगे यांची निवड निश्चित झाली असून, त्यांची निवड बिनविरोध पार पडली आहे. भाजपाने उपमहापौरपदासाठी शर्मिला बाबर यांना उमेदवारी देत आपली रणनीती स्पष्ट केली आहे.

दरम्यान, उपमहापौर पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नगरसेविका वैशाली काळभोर यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे उपमहापौर पदासाठी थेट भाजप विरुद्ध राष्ट्रवादी अशी लढत पाहायला मिळणार आहे.

महापौरपदावर भाजपाचा निर्विवाद विजय झाल्यानंतर आता उपमहापौर पदासाठीची निवडणूक औपचारिक न राहता राजकीयदृष्ट्या महत्त्वाची ठरणार आहे. शर्मिला बाबर विरुद्ध वैशाली काळभोर या लढतीकडे महापालिकेतील सत्तासमीकरणांच्या पार्श्वभूमीवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

या घडामोडींमुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेतील राजकारण तापले असून, शहराच्या नेतृत्वात कोणाची वर्णी लागणार, याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

# उपमहापौरपदासाठी राष्ट्रवादीची लढत

## वैशाली काळभोर यांचा उमेदवारी अर्ज दाखल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड शहराच्या उपमहापौर पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने अखेर मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला असून, पक्षाच्या ज्येष्ठ नगरसेविका वैशाली काळभोर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. महापौरपदाची निवडणूक बिनविरोध पार पडली असली, तरी उपमहापौर पदासाठी मात्र राजकीय लढत रंगणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनुभवी आणि ज्येष्ठ नगरसेविका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वैशाली काळभोर या महापालिकेतील सक्रिय नेतृत्व मानल्या जातात. नगरसेवक म्हणून त्यांच्या दीर्घ अनुभवासोबतच शहरातील नागरी प्रश्नांवरील ठाम भूमिका आणि संघटनात्मक ताकद लक्षात घेऊन राष्ट्रवादीने त्यांच्यावर उपमहापौरपदाची जबाबदारी सोपवण्याचा प्रयत्न केला आहे.

महापौरपदावर भाजपाचा उमेदवार बिनविरोध निवडून आलेला असताना, उपमहापौर पदासाठी राष्ट्रवादीने उमेदवार देत थेट राजकीय आव्हान उभे केले आहे. त्यामुळे उपमहापौर निवडणुकीत चुरस निर्माण झाली असून महापालिकेतील सत्तासमीकरणांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

वैशाली काळभोर यांच्या उमेदवारीमुळे राष्ट्रवादी काँग्रेसने आपली ताकद दाखवून दिली असून, उपमहापौरपदाची निवडणूक आता केवळ औपचारिक न राहता राजकीयदृष्ट्या महत्त्वाची ठरणार आहे.



# नवीन डेअरी फार्म उड्डाणपुलाला अजित पवार यांचे नाव द्या; राष्ट्रवादीची मागणी

## राष्ट्रवादी काँग्रेसकडून महापालिका आयुक्तांकडे औपचारिक निवेदन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी येथील नवीन डेअरी फार्म उड्डाणपुलाला 'लोकप्रिय दिवंगत उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार साहेब उड्डाणपूल' असे नामकरण करण्यात यावे, अशी ठाम मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रभाग क्र. 21 चे सर्व नगरसदस्य यांच्या वतीने डब्बू आसवानी यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तांकडे केली आहे.**



महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय दिवंगत उपमुख्यमंत्री तसेच पिंपरी-चिंचवड शहराचे शिल्पकार असलेल्या मा. अजितदादा पवार साहेबांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी दूरदृष्टीपूर्ण आणि ऐतिहासिक योगदान दिले आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आज सक्षम, आर्थिकदृष्ट्या सबळ आणि औद्योगिकदृष्ट्या प्रगत महानगरपालिका म्हणून उभी आहे, यामागे अजितदादा पवार साहेबांचे नेतृत्व व मार्गदर्शन अत्यंत मोलाचे ठरले आहे.

शहरातील पाणीपुरवठा योजना, रस्ते व वाहतूक व्यवस्था, औद्योगिक विकास, नागरी पायाभूत सुविधा, जलनिस्सारण व्यवस्था, तसेच महापालिकेची आर्थिक शिस्त व बळकटीकरण या सर्व क्षेत्रांत त्यांनी वेळोवेळी घेतलेले निर्णय शहराच्या प्रगतीसाठी दिशादर्शक ठरले. त्यांच्या प्रयत्नांमुळेच पिंपरी-चिंचवड शहराला स्वतंत्र, सक्षम आणि सशक्त औद्योगिक व नागरी ओळख प्राप्त झाली आहे.या पार्श्वभूमीवर, पिंपरी येथे उभारण्यात येत असलेल्या नवीन डेअरी फार्म उड्डाणपुलाला दिवंगत लोकप्रिय उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार साहेब यांचे नाव देण्यात यावे, जेणेकरून त्यांच्या कार्याची आणि योगदानाची आठवण कायमस्वरुपी जपली जाईल, अशी भावना निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

या मागणीची तत्काळ दखल घेऊन प्रस्ताव मंजूर करावा व संबंधित विभागास त्वरित कार्यवाहीचे निर्देश द्यावेत, अशी ठाम मागणी डब्बू आसवानी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रभाग क्र. 21 चे सर्व नगरसदस्य यांच्या वतीने केली आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सत्तारूढ पक्षनेतेपदी प्रशांत शितोळे यांची निवड

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सत्तारुढ पक्षनेतेपदी प्रशांत शितोळे यांची निवड करण्यात आली आहे. काही काळापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमधून भारतीय जनता पक्षात प्रवेश केलेले प्रशांत शितोळे हे महापालिकेतील अनुभवी आणि अभ्यासू नगरसेवक म्हणून ओळखले जातात.**



राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकाळात त्यांनी शहराच्या विकासासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय प्रक्रियेत सक्रिय भूमिका बजावली होती. प्रशासनाचा अनुभव, नागरी प्रश्नांची जाण आणि सभागृहातील पकड यामुळे भाजपने त्यांच्यावर सत्तारुढ पक्षनेतेपदाची जबाबदारी सोपवली आहे.

भाजपमध्ये प्रवेशानंतर त्यांनी अत्यंत कमी मताधिक्याने निवडणूक जिंकली असली, तरी त्यांच्या प्रदीर्घ अनुभवावर आणि कामकाजाच्या धडाडीवर विश्वास ठेवत पक्षाने त्यांना ही महत्त्वाची संधी दिली आहे.

निवडीनंतर प्रतिक्रिया देताना प्रशांत शितोळे यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहून काम करणार असल्याचा निर्धार व्यक्त केला. सत्तारुढ पक्षनेते म्हणून महापालिकेच्या सभागृहात विकासकामांना गती देणे, प्रशासनाशी प्रभावी समन्वय साधणे आणि नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देणे, हेच आपले ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या निवडीमुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेतील भाजपाचे नेतृत्व अधिक सक्षम झाले असून, अनुभवी आणि निर्णयक्षम नेतृत्व शहराच्या कारभारात पुढे आल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

# भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचा शब्द अखेर खरा ठरला..!

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**“पिंपरी-चिंचवड महापालिकेचा महापौर भाजपचाच असेल,” असा ठाम विश्वास भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी व्यक्त केला होता आणि अखेर तो प्रत्यक्षात उतरला आहे. भाजपकडून महापौरपदासाठी रवि लांडगे तर उपमहापौरपदासाठी शर्मिला बाबर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाचा महापौर निश्चित झाला आहे. तसेच, शर्मिला बाबर यांचीही निवड निश्चित मानली जात आहे.**



भारतीय जनता पक्षाच्या वतीने पिंपरी चिंचवड शहराच्या महापौर पदासाठी रवी लांडगे आणि उपमहापौर पदासाठी शर्मिला बाबर यांचे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. यावेळी भाजपाचे नेते आमदार महेश लांडगे, चिंचवडचे आमदार शंकर जगताप, सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, अमित गोरखे, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सदाशिव खाडे, ज्येष्ठ नगरसेविका अनुराधा गोरखे, नगरसेविका नम्रता लोंढे, ज्येष्ठ नगरसेवक राजू मिसाळ, नगरसेवक अभिषेक बारणे, माजी उपमहापौर केशव घोळवे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सुमारे आठ महिन्यांपूर्वी शत्रुघ्न काटे यांनी भाजप शहराध्यक्षपदाची धुरा स्वीकारली. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी शहरात संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यावर भर दिला आणि पक्षाची ध्येय-धोरणे तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. केंद्र व राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी शहरात करण्यात आली. त्याचा सकारात्मक परिणाम थेट महापालिका निवडणुकीच्या निकालात दिसून आला. दरम्यान, अल्पावधीत शहर संघटन मजबूत करत निवडणुकीत भाजपला यश मिळवून देणारे नेतृत्व म्हणून शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांची राजकीय वर्तुळात विशेष चर्चा होत आहे.

## शत्रुघ्न काटे यांचे पुन्हा “समर्पण”...

वास्तविक, महापौरपदासाठी तीव्र इच्छुक असलेले शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांना संधी मिळाली नाही. विशेष म्हणजे, 2017 मध्ये निवडून आल्यानंतर त्यांना महत्त्वाच्या पदावर संधी मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, त्यांना पदापासून वंचित ठेवण्यात आले. विधानसभा निवडणुकीत इच्छुक असताना त्यांना तिकीट मिळाले नाही. त्यानंतर पक्षाने त्यांच्यावर शहराध्यक्षपदाची जबाबदारी दिली. समर्पित भावनेतून काम करणारे शत्रुघ्न काटे भाजपासाठी पुन्हा एकदा “किंगमेकर” ठरले आहेत. भाजपने महापालिका निवडणुकीत शहरात एकहाती सत्ता मिळवत नागरिकांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर महापौरपदावर भाजपचाच उमेदवार विराजमान होणार, हे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी ठामपणे सांगितले होते. आज उमेदवारी अर्ज दाखल होताच काटे यांचे शब्द खरे ठरले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवड शहरात आरोग्य, शिक्षण, क्रीडा, पाणीपुरवठा आणि सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विकास सुरु आहे. हा विकासाचा वेग कायम ठेवण्याची जबाबदारी महापालिका सभागृह पार पाडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

> “पिंपरी-चिंचवडच्या प्रत्येक नागरिकासाठी विकासाची गाडी थांबणार नाही. महापालिका सभागृहातून घेतले जाणारे निर्णय प्रगतीला दिशा देतील आणि आमच्या नगरसेवकांच्या जबाबदारीने शहराचा सर्वांगीण विकास सुनिश्चित होईल. मी महापौरपदासाठी इच्छुक होतो. मात्र, संधी मिळाली नाही म्हणून नाराज नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सोपवलेली शहराध्यक्षपदाची जबाबदारी आणि भूमिका सक्षमपणे पार पडणार आहे. समर्पण भावनेतून काम करणे हीच भाजपाची शिकवण आहे.”
>
> - **शत्रुघ्न काटे** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968